आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ जानेवारी २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

- चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा आर्थिक सर्वेक्षण अहवालाचा अंदाज

- प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट, बिटिंग रिट्रीट समारंभ आज संध्याकाळी

**आणि**

- न्यूझिलंडविरूद्धच्या चौथ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा पराभव

**<><><><><>**

राज्याचे उपमुख्यमंत्री, तसंच अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर आज बारामती इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दोन्ही पुत्र पार्थ आणि जय पवार यांनी त्यांना मुखाग्नी दिला. यावेळी बंदुकीच्या ३ फेरी झाडून त्यांना सलामी देण्यात आली. त्यांच्या निधनामुळे राज्य सरकारनं ३ दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे.

अजित पवार यांच्या अंत्यसंस्काराला केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी, रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यासह विविध पक्षांचे नेते उपस्थित होते. तसंच जेष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह पवार कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते.

पवार यांच्या निधनानं संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली असून लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी हजारो शोकाकुल नागरिकांनी अंत्यसंस्काराच्या ठिकाणी गर्दी केली होती.

<><><><><>

बारामती इथं झालेल्या विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या, अजित पवार यांचे सुरक्षा अधिकारी विदीप जाधव यांच्यावर काल रात्री सातारा जिल्ह्यातल्या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. २००९ च्या तुकडीतले पोलीस हवालदार जाधव हे अजित पवार यांच्या सोबत विमानात होते.

<><><><><>

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अन्य चार जणांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स अपघातस्थळावरून ताब्यात घेण्यात आल्याची माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं दिली आहे. या प्रकरणाचा तपास सखोल आणि  पारदर्शकपणे करण्याला आणि तो निश्चित काळात पूर्ण करण्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याचं या मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी आज जालना शहर आणि जिल्ह्यात बंद पाळण्यात आला. जालना जिल्हा व्यापारी महासंघानं केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी बंद पाळला.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा अंदाज आज संसदेत सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हा अहवाल सादर केला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(ग्राहकांकडून होत असलेली खरेदी आणि गुंतवणूक या आधारे यंदा देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील आणि सलग चौथ्या वर्षी भारत ही जगातली सर्वाधिक वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था राहील, असा अंदाज या आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त केला आहे. दरडोई वार्षिक उत्पन्न २ लाख ५ हजार रुपयांवरुन, २ लाख २० हजार रुपयांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. आगामी आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ६ पूर्णांक ८ ते ७ पूर्णांक २ टक्क्यांच्या दरम्यान राहील, असा अंदाज आहे. जीएसटीमधे*

*केलेल्या सुधारणा, जागतिक पातळीवरच्या संकटांचं संधींमध्ये केलेलं रुपांतर, या सगळ्या गोष्टींशी जुळवून घेण्यासाठी अर्थव्यवस्थेला पुढचं वर्ष लागेल, असं यात नमूद केलं आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरची परिस्थिती अस्थिर असली तरी निराश व्हायचं कारण नाही. निर्यातीवर येत असलेले निर्बंध आणि प्रगत राष्ट्रांकडून तंत्रज्ञानाची होणारी अडवणूक यावर मात करण्यासाठी स्वदेशीवरचं अवलंबित्व वाढवण्याची गरज आर्थिक सर्वेक्षण अहवालात व्यक्त केली आहे. त्यासाठी कच्च्या मालाचे दर कमी करण्याचं धोरण यात सुचवलं आहे. पायाभूत सुविधा, परवडणाऱ्या दरात कच्चा माल उद्योगांना उपलब्ध झाला, मनुष्यबळ चांगल्या दरात उपलब्ध झालं तर देशांतर्गत निर्मित वस्तूंची किंमत कमी व्हायला यामुळं मदत होईल, असं यात म्हटलंय.*

*डॉलरच्या तुलनेत रुपयाचं सध्याचं मूल्य हे देशाच्या आर्थिक परिस्थितीचं नेमकं चित्र उभं करत नाही. २०२५ या वर्षात वस्तूंच्या आयातीत व्यापार तूट होती तर आयातीच्या तुलनेत आपण अधिक सेवांची निर्यात केली. पण रुपयाला सावरण्यासाठी हे पुरेसं ठरलं नसल्याचं आर्थिक पाहणी अहवालात नमूद केलं आहे. गुंतवणुकीसाठी सुरक्षित ठिकाण असल्यानं सोनं आणि चांदीतली तेजी येत्या काळातही कायम राहील असंही यात म्हटलं आहे.)*

**<><><><><>**

प्रलंबित समस्यांपलिकडे जाऊन दीर्घकालीन उपाययोजनांच्या मार्गावर देशाची वाटचाल होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी ते संसद भवन परिसरात बातमीदारांशी बोलत होते. सुधारणा, कार्यक्षमता आणि परिवर्तन या तीन तत्त्वांवर केंद्र सरकार काम करत आहे. विविध कल्याणकारी योजनांचा लाभ समाजाच्या शेवटच्या वर्गापर्यंत पोहोचवण्यावर सरकारचा भर असल्याचं असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारत ऊर्जा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेेंद्र मोदी यांनी काल जागतिक ऊर्जा क्षेत्रातल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. प्रधानमंत्र्यांच्या नवी दिल्लीतल्या लोककल्याण मार्गावरल्या निवासस्थानी ही बैठक झाली. भारत जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेना वाटचाल करत असून जागतिक उर्जा

पुरवठा साखळीत महत्त्वाची भूमिका निभावत आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. या संवादादरम्यान, प्रधानमंत्र्यांनी भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणुकीच्या संधींकडे लक्ष वेधलं. तसंच गुंतवणुकदारस्नेही धोरणात्मक सुधारणांचा उल्लेख करत अन्वेषण आणि उत्पादनामध्ये शंभर अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीची शक्यता अधोरेखित केली. कॉम्प्रेस्ड बायो गैसमध्ये ३० अब्ज अमेरिकन डॉलर्सची संधी असल्याचंही त्यांनी सांगितले.

<><><><><>

प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी झालेल्या सर्वोत्तम चित्ररथ आणि तुकडी यांचे निकाल काल जाहीर करण्यात आले आहेत. तिन्ही सेवा दलांपैकी भारतीय नौदलाला सर्वोत्तम मार्चिंग तुकडी म्हणून घोषित कऱण्यात आलं. तर राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या श्रेणीत महाराष्ट्राच्या गणेशोत्सवः आत्मनिर्भरतेचे प्रतीक या चित्ररथाला प्रथम क्रमांक मिळाला तर  जम्मू आणि काश्मीरच्या हस्तकला आणि लोकनृत्य, केरळचा वॉटर मेट्रो आणि १०० टक्के डिजिटल साक्षरता: आत्मनिर्भर भारतासाठी आत्मनिर्भर केरळ, हे चित्ररथ अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आले. केंद्र सरकारी मंत्रालय आणि विभागांमध्ये संस्कृती मंत्रालयाच्या वंदे मातरम - एका राष्ट्राची आत्मिक हाक, या चित्ररथासाठी पुरस्कार जिंकला. मायगव्ह पोर्टलवरील ऑनलाइन मतदानावर आधारित पॉप्युलर चॉइस अवॉर्ड्स देखील जाहीर करण्यात आले.

<><><><><>

७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याची सांगता करणारा बिटिंग रिट्रीट समारंभ आज संध्याकाळी दिल्लीत विजय चौकात होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसंच केंद्रीय मंत्री उपस्थित राहाणार आहेत. या समारंभात लष्कर, नौदल, वायुसेना आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाचे वाद्यवृंद सहभागी होणार आहेत.

बिटिंग रिट्रीट या समारंभात भारताच्या समृद्ध लष्करी वारशाचं दर्शन होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. देशाच्या रक्षणासाठी आपलं आयुष्य समर्पित करणाऱ्या जवानांविषयी देशवासियांना अभिमान आहे, असं ते म्हणाले.

सशस्त्र दलाची शिस्त, एकता आणि नितीमत्ता बिटिंग रिट्रिटमधून दिसते असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले. हा समारंभ देशाभिमानाचं प्रतीक आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या काल झालेल्या चौथ्या सामन्यात भारताला न्यूझिलंडकडून पराभव पत्करावा लागला. न्यूझिलंडच्या २१६ धावांचा पाठलाग करताना १९ व्या षटकात भारताचे सर्व फलंदाज तंबुत परतल्यामुळे भारताला १६५ धावाच करता आल्या. भारताकडून शिवम दुबेने ६५ आणि रिंकु सिंगने ३९ धावा केल्या. न्यूझिलंडच्या मायकेल सँटनरने तीन गडी बाद केले. त्याआधी न्यूझिलंडने टिम सेफर्टच्या ६२ आणि डेवॉन कॉनवेच्या ४४ धावांच्या जोरावर २१५ धावा केल्या.

<><><><><>

अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मुलभूत अधिकार असला तरी त्याचा वापर हा एखाद्या व्यक्तीविरोधात शिवराळ भाषा आणि अपमानजनक मोहिम राबवण्यासाठी केला जाऊ शकत नाही, असं दिल्ली उच्च न्यायालयानं म्हटलं आहे. बदनामीकारक मोहीम राबवणं, इतरांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणारं वक्तव्य करणं याला राज्यघटनेनं प्रतिबंध घातला आहे, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं.

//<><><><><>//